महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# पंचांग स्वरुपातील कॅलेंडर ऑनलाईन

22 Mar 2011, 0409 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

म. टा. प्रतिनिधी

मराठी माणसांचे नवीन वर्ष गुढीपाडव्यापासून सुरू होत असले, तरी नवीन कॅलेंडर तेव्हा सुरू होत नाही. म्हणूनच पंचांग स्वरूपात कॅलेंडर उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून 'शुभारंभ' केलेल्या शब्द-नि:शब्दचे हे कॅलेंडर ग्राहकांसाठी 'ऑनलाईन'ही उपलब्ध झाले आहे.

कॅलेंडर स्वरूपाच पंचांग असे या 'शुभारंभ'चे स्वरूप आहे. पंचांग तिथी शब्दरूपात दर्शविण्यात आली असून, इंग्रजी महिन्यांची तारीख आकड्यांमध्ये देण्यात आली आहे. मराठी महिना शुद्ध प्रतिपदा ते अमावस्या दरम्यान असतो. त्यामुळेच, मराठी महिन्याच्या कॅलेंडरमध्ये दोन इंग्रजी महिने वेगवेगळया रंगात दाखविण्यात आले आहेत. पंचांगातील सूर्योदय, सूर्यास्ताच्या वेळा, तिथी आणि नक्षत्र समाप्तीची वेळ तसेच कोणत्या राशीत ग्रह किती काळ असेल, याची माहितीही यातून देण्यात आली आहे. अनेकवेळा मराठी महिन्यांची माहिती नसते. त्यामुळेही हे कॅलेंडर उपयुक्त ठरेल. 'बुकगंगा डॉट कॉम' या वेबसाईटवरून ग्राहकांना हे कॅलेंडर ऑनलाईन खरेदी करता येणार आहे. त्याची किंमत २५ रुपये आहे.